# भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

**नोंदणीकृत कार्यालय :** भारत भवन, ४ व ५ करीमभॉय रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१.
**दूरध्वनी :** २२७१ ३००० / ४०००, **फॅक्स:** २२७१ ३८७४
**ई-मेल:** info@bharatpetroleum.in **वेबसाइट:** www.bharatpetroleum.in
**CIN:** L23220MH1952GOI008931

## भागधारकांना सूचना
### कंपनीचे इक्विटी समभाग इन्व्हेस्टर एज्युकेशन अ‍ॅण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) प्राधिकाऱ्यांच्या स्वाधीन करणे

इन्व्हेस्टर एज्युकेशन अ‍ॅण्ड प्रोटेक्शन फंड (अकौन्टिंग, ऑडिट, ट्रान्सफर अ‍ॅण्ड रिफंड) नियम, २०१६ सुधारित (''नियम'') सोबत वाचले असता कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १२४ अन्वये भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (''कंपनी'') भागधारकांना ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

ह्या नियमांनुसार इतर गोष्टींबरोबरच, सलग सात किंवा अधिक वर्ष भागधारकांनी लाभांशाचा दावा केला नाही असे इक्विटी समभाग आयईपीएफ प्राधिकाऱ्यांच्या डिमॅट खात्यात हस्तांतरित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

कंपनीने अशा भागधारकांचा आणि आयपीईएफ कडे हस्तांतरित करण्यास पात्र समभागांचा संपूर्ण तपशील त्यांच्या वेबसाईटवर www.bharatpetroleum.in येथे 'इन्व्हेस्टर' विभागात अपलोड केला आहे. दावा न केलेला लाभांश आणि आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित होण्यास पात्र समभाग यासंबंधी माहिती पडताळून पाहण्यासाठी भागधारकांना कंपनीची वेबसाईट पाहण्याची विनंती करण्यात येत आहे.

सध्याच्या कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर आम्ही पोस्टाने किंवा कुरियरने सूचना पाठवू शकणार नाही. त्यानुसार, वर्ष २०२०-२१ ह्या आर्थिक वर्षात ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांना योग्य कार्यवाही करण्यासाठी कंपनीपाशी नोंदणीकृत असलेल्या ई-मेलवर पत्रव्यवहार पाठविण्यात येत आहे. ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडी कंपनीपाशी/समभाग हस्तांतरण एजंट (आरटीए) मेसर्स डेटा सॉफ्टवेअर रिसर्च कं. प्रा. लि. यांच्यापाशी नोंदविलेल्या नाहीत असे भागधारक कंपनीच्या वेबसाईटवर ही सूचना पाहू शकतात. ज्यांच्या ई-मेल आयडी कंपनीपाशी/समभाग हस्तांतरण एजंट (आरटीए) मेसर्स डेटा सॉफ्टवेअर रिसर्च कं. प्रा. लि. यांच्यापाशी नोंदविलेल्या नाहीत अशा भागधारकांनी ही सूचना व्यक्तिगत सूचना समजावी. त्याशिवाय, ज्यांनी त्यांच्या ई-मेल आयडी नोंदविलेल्या नाहीत अशा भागधारकांना आम्ही जर त्यांचे समभाग इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असल्यास त्याची संबंधित डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदणी करण्याची आणि प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण केले असल्यास आरटीए मेसर्स डेटा सॉफ्टवेअर रिसर्च कंपनी प्रा. लि. यांच्याकडे नोंदविण्याची विनंती करत आहोत.

वरील दृष्टीकोनातून सर्व भागधारकांना विनंती करण्यात येत आहे की त्यांनी वर्ष २०१२-१३ पासूनच्या न दिलेल्या लाभांशाचा दावा करण्यासाठी कंपनीच्या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या नमुन्यात कंपनीकडे/कंपनीचे आरटीए यांचेकडे १२ ऑक्टोबर २०२० रोजी किंवा तत्पुर्वी अर्ज करावा त्यामुळे त्यांचे समभाग नियोजित तारखांना आयईपीएफ कडे हस्तांतरित केले जाणार नाहीत. कृपया याची नोंद घ्यावी की, कंपनीकडे किंवा कंपनीचे आरटीए यांच्याकडे १२ ऑक्टोबर २०२० रोजी किंवा तत्पुर्वी कोणताही अर्ज प्राप्त झाला नाही तर कोणतीही आगाऊ सूचना न देता अंतिम तारखांना सदर नियमांमध्ये नमूद करण्यात आलेल्या कार्यपद्धतीची अंमलबजावणी करून सदर समभाग आयईपीएफ कडे हस्तांतरित करणे कंपनीवर बंधनकारक राहिल.

ज्यांच्याकडे प्रत्यक्ष स्वरूपातील समभाग आहेत आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी याची नोंद घ्यावी की, त्यांच्यापाशी असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्र(त्रां)च्या ऐवजी कंपनी नियमांनुसार सदर समभाग डिमटिरिअलाइज करण्यासाठी आणि आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यासाठी नवीन समभाग प्रमाणपत्र(त्रे) जारी करेल आणि अशा प्रकारे प्रमाणपत्र जारी केल्यानंतर त्यांच्या नावे नोंदविण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र(त्रे) आपोआप रद्द होतील आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. जर संबंधित भागधारकांकडे डिमटिरिअलाईज्ड स्वरूपात समभाग असतील आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित होण्यास पात्र असतील तर कंपनी कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारे डिपॉझिटरीजमार्फत केन्द्र सरकारने स्थापन केलेल्या आयईपीएफ प्राधिकाऱ्यांच्या डिमॅट खात्यात सदर समभाग हस्तांतरित करेल. भागधारकांनी याची अधिक नोंद घ्यावी की, कंपनीद्वारा वेबसाईटवर तपशिल अपलोड करण्याचा अर्थ कंपनीद्वारा नियमांनुसार समभाग आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यासाठी नवीन समभाग प्रमाणपत्र(त्रे) जारी करण्याच्या संदर्भात ती योग्य सूचना समजण्यात येईल.

कृपया याची नोंद घ्यावी की, दावा न केलेला लाभांश आणि सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या समभागांचा त्यांना नियमांमध्ये नमूद करण्यात आलेल्या पद्धतीचा पाठपुरावा करून एमसीए यांच्या वेबसाईटवर www.iepf.gov.in येथे उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातील ई-फॉर्म आयईपीएफ-५ अर्ज करून आयईपीएफ यांचेकडून पुन्हा दावा करता येईल.

ह्या संदर्भात काही स्पष्टीकरण हवे असल्यास, सदस्य कंपनीला त्यांच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या पत्यावर लिहू शकतात किंवा ssc@bharatpetroleum.in येथे ई-मेल पाठवू शकतात किंवा ई-मेलद्वारे bpcl@dsrc-cid.in येथे किंवा आमचे रजिस्ट्रार व समभाग हस्तांतरण एजन्ट, डाटा सॉफ्टवेअर रिसर्च कं. प्रा. लि. (कॅपिटल इश्यू डिव्हिजन), #१९, पायक्रॉफ्टस गार्डन रोड, हॅडोवज रोडजवळ, नुंगम्बक्कम, चेन्नाई – ६०० ००६, दूरध्वनी क्रमांक: +९१-४४-२८२१ ३७३८/२८२१ ४४८७, येथे अधिक माहितीसाठी आणि कंपनीपाशी असलेल्या दावा न केलेल्या लाभांशाचा कायदेशीर दावा करण्यासाठी पत्रव्यवहार करावा अन्यथा संबंधित समभाग आयईपीएफ यांचेकडे अंतिम तारखेला हस्तांतरित करण्यात येतील.

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड करिता

स्वाक्षरी/-

**तारीख** : ०७.०७.२०२० **(व्ही. कला)**

**स्थळ** : मुंबई कंपनी सचिव

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर
पहल
#GiveItUp
खुशियां बांटने की खुशी
उज्ज्वला

HAR EK KAAM DESH KE NAAM